हवामान आधारीत कृषि सल्ला

ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र,
डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल:: kvk_ndb@yahoo.com

५०) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २१ सप्टेंबर, २०२१

जिल्हा : नंदुरबार

हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (दि. २२.०९.२०२१ ते २६.०९.२०२१)				
दिनांक	२२	२३	२४	२५	२६
पाऊस (मि. मी.)	६९	४३	५५	५०	३४
कमाल तापमान (अं. से.)	३१	३१	३१	३०	३०
किमान तापमान (अं. से.)	२४	२४	२४	२४	२४
ढग स्थिति (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आद्रता (%)	९१	९१	९१	९२	९१
दुपारची सापेक्ष आद्रता (%)	६६	६६	६६	७०	७२
वाऱ्याचा वेग (किमी/तास)	१२	१०	९	१०	९

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषी विषयक सल्ला
हवामान अंदाज सारांश		भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार, जिल्ह्यात पुढील पाच दिवस मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच कमाल तापमान ३१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २४ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. दरम्यान आकाश ढगाळ राहील. **हवामान इशारा:** दि. २१ ते २३ सप्टेंबर रोजी एक दोन ठिकाणी विजांचा कडकडाट व वादळी वा-यासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. **पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज:** २६ सप्टेंबर ते २ अक्टोबर २०२१ दरम्यान मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे तसेच कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता आहे.
➢ हवामान अंदाज आणि कृषी सल्ला पाहण्यासाठी **"मेघदुत"** मोबाईल ॲपचा वापर करावा. ➢ वादळी वारे आणि विजांच्या पूर्वसूचना मिळवण्यासाठी **"दामिनी"** मोबाईल ॲपचा वापर करावा.		
सामान्य सल्ला		सर्व पिके वेळेवर आंतरमशागत करून तणविरहीत ठेवावीत. पिकांवर किडीचा आणि रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास वेळेवर पीक संरक्षण करावे.
संदेश		दि. २१ ते २३ सप्टेंबर रोजी एक दोन ठिकाणी विजांचा कडकडाट व वादळी वा-यासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.
मुग व उडीद	पक्वता	पावसाची शक्यता असल्याने पक्वता अवस्थेत असलेल्या पिकांची काढणी करून

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल:: kvk_ndb@yahoo.com

		पावसाने भिजणार नाही अशा सुरक्षित ठिकाणी ठेवावे.
तुर	फांद्या वाढीची अवस्था	पावसामुळे तुरीची खालची पाने पिवळी पडली असल्यास नत्राची कमतरता लक्षात घेऊन दोन टक्के युरियाची किंवा डीएपीची (२ किलो प्रति १०० लिटर पाणी) फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी. फवारणी शक्य नसल्यास निंबोळी पेंड ५० किलो व युरिया २० किलो प्रति एकरी कोळपणी देण्यापूर्वी वापरावे.
मका	वाढीची ते पोटरी अवस्था	मका पिकात अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास शक्य असल्यास अंडीपुंज गोळा करुन नष्ट करावेत. किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच पोंग्यामध्ये वाळू टाकावी. असे केल्याने अळीला वाढीच्या भागातील खाण्यापासून परावृत्त करता येईल व शेंडा तुटणार नाही. अळीच्या वाढीच्या लवकरच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निमअर्क १५०० पीपीएम किंवा निंबोळी अर्क ५% यांची ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा थायमेथोक्झाम १२.६% + लॅम्डा सायहेलोथ्रीन ९.५% झेड सी या मिश्र कीटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी.
कापूस	वाढीची ते फुले येण्याची अवस्था	कापूस पिकात पावसामुळे होणारी पात्या, फुले यांची गळ कमी करण्यासाठी नॅप्थॅलिन ॲसेटिक ॲसीड (प्लॅनोफिक्स) या संजीवकाची हेक्टरी १०० मि.लि. ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून पात्या लागल्या असतील तेव्हा हवामान कोरडे असताना पहिली फवारणी करावी. दुसरी फवारणी त्यानंतर १५ ते २० दिवसांनी करावी. मॅगनेशियमच्या कमतरतेमुळे कापसाची पाने लाल पडत असल्यास डीएपी २ % + मॅगनेशियम सल्फेट ७५ ग्रॅम मिसळून प्रति पंप फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी.
सोयाबीन	फुलोरा ते शेगा भरण्याची अवस्था	सोयाबीन पिकावर खोडमाशी, चक्रीभुंगा सोबतच पाने खाणाऱ्या व शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास थायमिथोक्झाम (१२.६%) + लॅमडा सायहॅलोथ्रिन (९.५% झेडसी) हे संयुक्त कीटकनाशक ०.२५ मि.लि. किंवा क्लोरॲंट्रानिलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मि.लि. प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी.
ज्वारी	फुलोरा ते दाणे भरण्याची अवस्था	ज्वारी पिकात लष्करी अळी या किडीच्या नियंत्रणासाठी मॅलॅथिऑन ५ टक्के डी.पी. (भुकटी) प्रति हेक्टरी २० किलो या प्रमाणात वारा शांत असतांना धुरळणी पावसाची उघडीप पाहून करावी.
सुरु ऊस	वाढीची अवस्था	पांढरी माशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास पाणी साचत असल्यास चर काढून निचरा करावा. प्रादुर्भावग्रस्त पाने कापून गाडून नष्ट करावीत. क्रायसोपर्ला कार्निया या भक्षक मित्रकिडीचे एकरी ४०० प्रौढ अथवा ८०० अंडी प्रसारित करावीत. प्रादुर्भाव जास्त असल्यास, डायमेथोएट (३० ईसी) २.५ मि.लि. प्रतिलिटर पाणी प्रमाणे पावसाची उघडीप पाहून फवारावे.
कांदा	वाढीची अवस्था	पावसामुळे मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात टाकून आवळणी पावसाची उघडीप पाहून करावी.
आंबा	रोप अवस्था	नवीन लागवड केलेल्या आंबा बागेतील अतिरिक्त पाण्याचा वेळीच निचरा होईल, याची व्यवस्था करावी. कलामांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. वाऱ्यांमुळे कलमे कोलमडून पडू नयेत, यासाठी त्यांना मातीची भर द्यावी. कलमांना काठीचा आधार द्यावा.
पपई	वाढीची अवस्था	झालेल्या पावसामुळे खोडकुज किंवा बुंधासड या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतात पाणी साचले असल्यास निचरा करण्याची व्यवस्था करावी.

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल:: kvk_ndb@yahoo.com

केळी	वाढीची अवस्था	पावसाचे पाणी शेतात साचून राहिले असल्यास केळीची पाने पिवळी पडली असल्यास पाण्याचा निचरा केल्यानंतर कार्बेन्डाझिम (५० डब्ल्यूपी) २ ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल (२५ ईसी) २ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून या द्रावणाची झाडाच्या बुडालगत आळवणी करावी.
पशुसंवर्धन	-	**लंपी स्कीन डिसीज** **उपाययोजना** ☞ निरोगी जनावरांना या आजाराचा संसर्ग होऊ नये म्हणून बाधित जनावरे वेगळी बांधावीत. ☞ डास, माश्या, गोचीड इत्यादींचे प्रमाण कमी करण्यासाठी आजारी नसलेल्या जनावरांवर तसेच गोठ्यात आवश्यक औषधांची फवारणी करावी. ☞गोठा स्वच्छ ठेवावा. गोठ्यात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. ☞बाधित भागातील जनावरे व मानवाचा निरोगी भागात प्रवेश टाळावा. गोठ्यास भेटी देणाऱ्यांची संख्या मर्यादित असावी. ☞जनावराचा मृत्यू झाल्यास मृतदेहाची शास्त्रीय पद्धतीने कमीत-कमी ८ फूट खोल खड्ड्यात गाडून विल्हेवाट लावावी. ☞बाधित क्षेत्रात गाई-म्हशींची विक्री, पशूबाजार इत्यादी बंद करावे. ☞बाधित अथवा संशयित जनावरांचा उपचार करताना किंवा रोगाचे नमुने गोळा करताना पीपीई कीट वापरावे. हात धुऊन घ्यावेत. तपासणीनंतर सर्व साहित्य निर्जंतुक करावे. ☞बाधित परिसरात स्वच्छता करावी. १% फॉर्मलीन किंवा २-३% सोडियम हायपोक्लोराइट द्रावणाची फवारणी करून परिसर निर्जंतुक करावा. ☞प्रादुर्भावग्रस्त भागापासून ५ किलोमीटर त्रिज्येत येणाऱ्या सर्व गावांमधील ४ महिने वयावरील गाय-म्हैस वर्गातील जनावरांना पशूतज्ञांकडून गोट पॉक्स लस १ मि.लि./ जनावर याप्रमाणे सब-क्युटॅनियस मार्गाने टोचावी. आधीच रोगग्रस्त असणाऱ्या जनावरांना लस टोचू नये. ☞आजाराची लक्षणे जनावरात आढळल्यास पशुपालकांनी त्वरित जवळच्या शासकीय दवाखान्यात कळवून तज्ञांमार्फत योग्य उपचार करून घ्यावे.

१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार
दि. : २१/०९/२०२१

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-
जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र,
नंदुरबार